RNI No. MAHAUL03008/13/1/2012-TC

# POWER OF KNOWLEDGE

An International Multilingual Quarterly Peer Review Refereed Research Journal

**Editor**
**Prof. Dr. Sadashiv H. Sarkate**

**● Mailing Address ●**
**Prof. Dr. Sadashiv H. Sarkate**
**Editor : POWER OF KNOWLEDGE**
**Head of Dept. Marathi**
Art's & Science College, Shivajinagar, Gadhi, Tq. Georai Dist. Beed-431 143 (M.S.)
Cell. No. 9420029115 / 7875827115
Email : powerofknowledge3@gmail.com /
shsarkate@gmail.com

**Price : Rs. 300/-**
**Annual Subscription: Rs. 1000/-**

RNI No.MAHAUL03008/13/1/2012-TC ISSN 2320-4494

# POWER OF KNOWLEDGE

An International Multilingual Quarterly Peer Review Refereed Research Journal

*November Special Issue - IV 2021*

Editorial Officer
**Kranti Publication**
Georai Dist.Beed
Beed -431 127
Contact : 7875827115
**E-mail** : Sarkatelata@gmail.com

**Published By :**
Mrs. Lata Sadashiv Sarkate

**Price** : Rs. 300/-

**Advisory :-**

**Hon. Dr. Sudhir Gavhane**
Vice Chancellor M.G.M.U. Aurangabad & Ex.Vice Chancellor Y.C.M.U. Nasik & Professor of Mass Communication & Jornalism Dr.B.A.M.U. Aurangabad

**Hon. Dr.Pratibha Aher**
Management Council Member
Dr.B.A.M.U. Aurangabad

**Hon. Dr. Madan Shivaji**
Ex-Management Council Member
Dr.B.A.M.U. Aurangabad

**Hon. Dr. Bhagwat Katare**
Ex. Director, BCUD
Dr.B.A.M.U. Aurangabad

**Hon. Dr. Sanjay Nawale**
Head of Dept. Hindi
Dr.B.A.M.U.Aurangbad

**Hon. Dr. Paralikar Kanchan**
Principal, Mahila College, Georai

**Hon. Dr. Ashok Mohekar**
Ex-Magement Council Member
Dean, Faculty of Science,
Dr.B.A.M.U. Aurangabad

**EDITOR**

***Prof. Dr.Sadashiv Haribhau Sarkate***
Senate Member, Ex-Chairman-BOS in Marathi, Dr.B.A.M.U.Aurangabad
Associate Professor & Head, Dept. of Marathi, JBSPM's
Arts & Science College, Shivajinagar, Gadhi Tq. Georai Dist. Beed

**EDITOR BOARD**

**Dr. Mala Nurilmala**
Dept of Aquatic Product Technology
Faculty of Fisheries and Marine Sciences
Bogor Agricultural University, Indonsia

**Dr. Bharat Handibag**
Ex-Dean, Faculty of Arts
Dr.B.A.M.U.Aurangabad

**Dr. Dhere R.M.**
Dept.of Zoology
Swa.Sawarkar Mahavidayala, Beed

**Dr. Vasant Biradar**
Princial, Mahatma Phule
Mahavidyalaya,Ahmedpur,Dist.Latur

**Dr.Sudhakar Shendge**
Professor of Hindi
Dr.B.A.M.U.Aurangbad

**Dr.D.P.Takale**
Professor & Head
Dept. of Economics
L.B.S.College, Partur Dist.Jalna

**Dr.Ganesh Adgaonkar**
Kalika Devi ,Collage
Shirur Kasar Dist.Beed

**Dr.Aparna Ashtaputre**
Dept. of Psychology,
Dr.B.A.M.U.Aurangbad

**Dr. Vitthal S. Jadhav**
Dept. of Pub.Administration,
Kalikadevi College, Shirur (K.), Dist.Beed

**Dr. Kadam Mangal S.**
PG Dept.of Zoology
Yeshwant Mahavidayala, Nanded

**Dr. Rajesh Karpe**
Management Council Member
Dr.B.A.M.U.Aurangabad

**Dr. Taher H. Pathan**
Aligad Muslim university, Aligad (U.P.)

**Dr.S.D.Talekar**
Professor, Dept. of Commerce
L.B.S.College, Partnr Dist Jalna

**Dr.S.R.Takale**
Principal, Sant Sawatamali, College,
Phulambri Dist. Aurangabad'

**Dr.Bharat Khandare**
Principal, Swami Vivekanand College, Mantha.
Dist. Jalna

**Dr.Vishwas Kadam**
Principal, JBSPM's Arts & Science College,
Gadhi Tq.Georai, Dist. Beed

**Dr.Fulchand Salampure**
Management Council Member
**Dr.B.A.M.U.Aurangabad**

**PEER REVIEW / REFERECS**

**Dr.Shahaji Gaikwad**
Ex-Chairman, BOS in English
Dr.B.A.M.U.Aurangabad

**Dr.Vishwas Patil**
Radha Nagari College,Radha
Nagari, Dist. Kolhapur

**Dr. Dilip Khairnar**
Professor, Sociology
Deogiri College, Aurangabad

**Dr. Santos Chavan**
Shivchhatrapati College,
Pachod, Dist. Aurangbad

**Dr. Shivaji Yadhav**
Shivchhatrapati College,
Pachod, Dist. Aurangbad

**Dr. Laxmikant Shinde**
Assit.Professor
JES College, Jalna

**MANGING EDITORS**

**Mr. Ramesh Ringne**
**Prof. Bapu Ghokshe**
**Mr. Shivaji Kakade**
**Dr. Shakur Shaikh Husain**

**Mr. Vinod Kirdak**
**Dr. Dattu Tangalwad**
**Mr. Kalandar Pathan**
**Dr. Suhas Morale**
**Dr. Baliram Katare**

**Assit.Prof.Mohan Kalkute**
**Dr. Adgaonkar Ganesh**
**Dr. Santosh Chavan**
**Dr. Rajkumar Yallawad**

अ. व्या. शि. ... संस्था ... देगलूर

# Guidelines for Writers

- "Power of Knowledge" the referred research journal has permission and registered of RNI, Ministry of Information and Broadcasting, Govt, of India.

  Research papers in all subjects of all faculties in Hindi, English, Marathi will be published in "Power of Knowledge".

- Research scholars should sent their papers in Marathi, Hindi and English on one side typed papers. It should be in Pagemaker or word format with a CD. Scholars should send their papers through registered / speed post. A Xerox copy of papers should be enclosed.

- The writer should give a letter of undertaking that he / she has not violated copy right act and the whole responsibility will not be liable of any legal action. This undertaking is compulsory with the research paper.

- Directions regarding fonts

  English **Times New Roman or any 12** font

  Hindi & Marathi **ISM DVB TT- Surekh Pagemaker, Font 14**

- Research paper should be in A-4 size upto 4-5 pages, value language and references should be mentioned.

- There should not be grammatical mistakes.

- If the research paper published in "Power of Knowledge" not accepted by Research Recognition Committee/University Body/other research related committees, the Editor/Printer/Publisher will not take any responsibility of the same.

- All the postal contact should be to the address of editor through registered post only.

- Despute shall be subject to hearing at Hon'ble BEED (M.S.) Jurisdiction only.

Ideas expressed in "Power of Knowledge" belongs to the writer exclusively. The editor, publisher & printer of "Power of Knowledge" have nothing to do it with them. At the same time it is made clear that if writers violate copyright act, they will be responsible for their own action. Hence, it is clarified from editor, publisher and printer's side.

Index (अनुक्रमणिका)


| अ.क्र. | प्रकरण | संशोधक | पृष्ठ क्रं. |
|---|---|---|---|
| 1 | Financial Literacyand Digital Payment System In India | Dr. MaindBalasahebVaijanath | 1-7 |
| 2 | Impact of Globalization on English Language | Dr. Subhash S. Waghmare | 8-12 |
| 3 | A Great Never Give Up Personality Artist P.N.Choyal | Jyoti Singh | 13-17 |
| 4 | Public Libraries of Tarakeswar Block in the Hooghly District of West Bengal: Present-day Scenario | Bikash Kumar Halder<br>Bibhash Ram Singha | 18-24 |
| 5 | Geographical study of green agriculture | Dr.Ghodke.J.V. | 25-27 |
| 6 | Need to Know Malnutrition | Dr. Manisha Pandurang Wanjari | 28-31 |
| 7 | Adolescent Reproductive and Sexual Health (ARSH) services in Gadchiroli- A rapid analysis | Mayank Mohan Mishra | 32-35 |
| 8 | A Study Of The Impact Of Digital Marketing In Sustaibale Development Of India | Mrs. Prof. Pratibha Dattatrya Pudale | 36-40 |
| 9 | Imperical Study Of Relationship Between Occupation Stress And Emotional Intelligence During Covid -19 | Dr. Anita Manna<br>Bipinchandra S. Wadekar. | 41-46 |
| 10 | Transfer: Effective Tool For Accountable Administration | Dr. More Navanath Bhagawan | 47-51 |
| 11 | मराठी साहित्यातील गझलेचा उगम व स्वरुप | शीतल अण्णासाहेब सुसरे | 52-55 |
| 12 | भारतीय महिलांवरील अत्याचार - एक सामाजिक चिंतन | प्रा.कोंगे दिलीप महादू | 56-61 |
| 13 | रानवाटा' कविता संग्रहातील आदिवासींच्या प्रश्नांचे दर्शन | डॉ.किशोर नथू सोनवणे<br>डॉ.मधुचंद्र लक्ष्मण भुसारे | 62-67 |
| 14 | गुरुसंस्था : प्राचीन व मध्ययुगीन संदर्भ | प्रा.डॉ.दत्तात्रय प्र. डुंबरे | 68-74 |
| 15 | महात्मा फुले आणि भारतीय शिक्षण | डॉ.राजेश्वर दुडूकनाळे | 75-80 |
| 16 | चरित्र - आत्मचरित्र : स्वरुप व संकल्पना | प्रा.डॉ.राहुल हांडे<br>श्री.रविंद्र मधुकर चव्हाण | 81-84 |
| 17 | मुस्लीम लेखिकांच्या आत्मचरित्रातुन आलेले भाषाविशेष | प्रा.डॉ.केतकी प्र.भोसले | 85-88 |
| 18 | फकिरा : आशय आणि अभिव्यक्ती | डॉ.राजेश्वर मा. दुडुकनाळे | 89-92 |
| 19 | शाहीर साहेबराव येरेकराच्या शाहिरीतून प्रकटणारी डॉ. बाबासाहेब आंबेडकराविषयीची कृतज्ञता | चारुमती नारायण भदरगे | 93-97 |
| 20 | डॉ. जयंत नारळीकरांचे विज्ञान साहित्यातील योगदान | डॉ. दिलीप पवार<br>डॉ. संजय शिंदे | 98-102 |

Power of Knowledge Peer Review Journal, November Special Issue-II 2021 ISSN 2320-4494 Impact factor 3.7286

# फकिरा : आशय आणि अभिव्यक्ती

डॉ.राजेश्वर मा. दुडुकनाळे
सहायक प्राध्यापक, मराठी विभाग
देगलूर महाविद्यालय, देगलूर जि.नांदेड

भारतीय समाजात हजारो वर्षापासून सामाजिक आणि धार्मिक गुलामगिरी दिसून येते. वैदिक धर्माच्या विषमतावादी तत्त्वज्ञानामुळे या समाजात वर्णव्यवस्था, जातिव्यवस्था आणि अस्पृश्यता निर्माण झाली. सर्व प्रकारच्या सत्ता धर्माच्या प्रभावाखाली आणून वैदिकांनी धर्मसत्ता हजारो वर्षे स्वतःच्या ताब्यात ठेवली. परिणामी बहुसंख्य समाज उपेक्षित, शोषित राहिला. अशाही अवस्थेमध्ये काहींनी शोषणाचा प्रतिकार केला. अशा उपेक्षित समाजाला, त्या समाजातील शूद्र, लढाऊ नायक-नायिकांना न्याय देण्यासाठी अण्णाभाऊ साठे यांनी कादंबरी लेखन केले आहे. त्यांच्या कादंबरीतून व्यक्त होणाऱ्या जाणिवांचे स्वरूप समजून घेणे आवश्यक आहे. कोणती जीवनमूल्ये त्यांच्या कादंबरीतून व्यक्त होत, याचा शोध घेतल्यास या जाणिवांचे स्वरूप समजणे लक्षात येईल आणि त्यांच्या कादंबरी लेखनाची वैशिष्ट्येही लक्षात येतील. त्यांच्या 'फकिरा' कादंबरीच्या आशयाच्या अंगाने विचार करणे आवश्यक आहे. त्याशिवाय विद्रोही जाणिवा लक्षात येणार नाहीत.

अण्णाभाऊ साठे यांनी अनेक दर्जेदार कादंबऱ्या लिहिल्या आहेत. अनेक संदर्भग्रंथात त्यांच्या कादंबऱ्यांची संख्या वेगवेगळी असली तरी सुमारे पस्तीस कादंबऱ्या त्यांच्या नावावर आहेत. यापैकी उपलब्ध कादंबऱ्यांतून आलेल्या विद्रोही जाणिवांचे स्वरूप समजून घेणे आवश्यक आहे. शूर नायक-नायिकांच्या कथा, स्त्रियांचे प्रश्न, प्रेम-शृंगारविषयक कथांबरोबरच ग्रामीण जीवनव्यवहाराचे चित्रण त्यांच्या कादंबऱ्यांतून आले आहे. शोषितांचे जगणे आणि त्या जगण्यातील संघर्ष हे त्यांच्या कादंबरी लेखनाचे सूत्र आहे. त्यामुळे विद्रोही, संघर्षमय जाणिवा या कादंबऱ्यांतून व्यक्त होतात

विद्रोही दृष्टिकोनातून अत्यंत महत्त्वाची कादंबरी म्हणून 'फकिरा'चा विचार करावा लागतो. अण्णाभाऊंच्या एकूण कादंबरी लेखनामध्ये ही कादंबरी सर्वोत्तम समजली जाते. या कादंबरीच्या अर्पणपत्रिकेतून सुद्धा लेखकाची बंडखोर भूमिका लक्षात येते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या झुंजार लेखणीला अण्णाभाऊंनी ही कादंबरी अर्पण केली आहे. 'फकिरा'च्या सुरुवातीलाच लेखकाने मांडलेली 'कैफियत' बरेच काही सांगून जाते. 'कैफियत'मधूनकादंबरीलेखनामागील प्रेरणा जशी लक्षात येते तशीच लेखकाची विद्रोही भूमिकाही समजते.प्रस्तुत कादंबरी एकूण पंधरा प्रकरणात विभागलेली आहे. एकशे पंचेचाळीस पृष्ठ संख्या (अठ्ठाविसावी आवृत्ती, २०१०) असलेली ही कादंबरी अतिशय आशयसंपन्न आहे. तिच्यातून व्यक्त होणाऱ्या विद्रोही जाणिवा समजावून घेण्यापूर्वी तिचे कथासूत्र थोडक्यात लक्षात घेणे आवश्यक आहे.

वाटेगाव हे वारणेवर असलेले एक गाव. या गावात जत्रा भरावी अशी शंकरराव पाटील यांची इच्छा असते. ही त्यांची इच्छा पूर्ण करण्यासाठी आणि वाटेगावच्या भल्यासाठी राणोजी मांग शिगावच्या जत्रेतील जोगणी मोठ्या हिंमतीने पळवितो. जोगणी घेऊन राणोजी मांग परतत असताना रिवाज मोडून बापू खोत त्याचे



213

शीर कापतो. राणोजीचे शीर आणण्यासाठी संपूर्ण वाटेगाव सीमेवर धाव घेतो. वाटेगाव आणि शिगाव मध्ये मोठा संघर्ष निर्माण होतो. शेवटी मातीमा खोत आपल्या मुलासोबत म्हणजे बापू खोतासोबत भांडण करून राणोजीचे शीर परत करतो. गावासाठी प्राण देणाऱ्या राणोजीबद्दल सर्वांना अभिमान वाटतो. याच राणोजीचा मुलगा म्हणजे फकिरा. बालपणातच त्याच्या बंडखोर मनाचा अनुभव लोकांना येऊ लागतो. बालपणी फकिरा आणि त्याचे मित्र लष्कर पाहायला जातात. तेथे बापू खोताला पाहून फकिराच्या मनात चीड निर्माण होते.

पाचव्या प्रकरणामध्ये नऊ वर्षानंतरच्या जोगणीमुळे निर्माण झालेला संघर्ष आला आहे. बापू खोताचा वाटेगाव मधून जोगणी पळविण्याचा प्रयत्न फकिरा हाणून पाडतो. सावळाला इंग्रजांच्या तावडीतून सोडवून आणण्याची विनंती फकिरा पंतांना करतो. पंत प्रांत अधिकाऱ्याशी भांडून सावळा मांगाची सुटका करतात अशातच गोंवा गोंधळी कुमजेच्या सत्तूचा निरोप घेऊन येतो. कुमजेचा सत्तू भोसले हा श्रीमंतांचा कर्दनकाळ आणि गरिबांचा कैवारी असतो. तो पकडला जातो. फकिरा आपल्या साथीदारांच्या मदतीने सत्तूची सुटका करतो. पुढे फकिराचे लग्न होते. अशातच दुष्काळामुळे लोकांचे हाल होऊ लागतात. त्यामुळे फकिरा माळेवाडीच्या मठावर हल्ला करून धान्य ताब्यात घेतो. या हल्ल्यामुळे मांगांना अटक होते पंतांच्या प्रयत्नाने नंतर सुटकाही होते; परंतु मांगांवर व महारांवर दररोज हजेरीची सक्ती केली जाते. भुकेने आणि दुष्काळाने हैराण झालेल्या अस्पृश्यांचे इंग्रजांकडून शोषण सुरूच राहते. हजेरीमुळे फकिराच्या मनात प्रचंड चीड निर्माण होते. त्यामुळे तो पाटलाला मारहाण करतो. गाव आणि महार-मांग यांच्यात दुफळी माजू नये म्हणून फकिरा आपल्या साथीदारांसह गाव सोडतो.

दुष्काळाने आणि आर्थिक मागासलेपणामुळे खचलेल्या लोकांना जिवंत ठेवण्यासाठी फकिरा बेडसगावचा खजिना ताब्यात घेतो. त्यामुळे फकिराला पकडण्यासाठी इंग्रजांच्या छावणीत चर्चा केली जाते. फकिरा सापडत नाही हे लक्षात आल्यानंतर इंग्रजांकडून मांगांचा दारकोंड केला जातोशोषित समाजाच्या हक्कासाठी, न्यायासाठी लढणारा फकिरा या कादंबरीमध्ये पाहावयास मिळतो. यादृष्टीने तो उपेक्षितांचा नायक आहे. म्हणून डॉ. बाबुराव गुरव म्हणतात, "फकिरा हा उपेक्षित दीनदलितांच्या स्वातंत्र्यलढ्याचा वाङ्मयीन वेधच मानाया लागेल. आजवरच्या मराठी साहित्यात म. फुले, महर्षि शिंदे, डॉ. आंबेडकर, राजर्षि शाहू महाराज या व अशा अनेकांनी दलितांच्या सामाजिक, सांस्कृतिक मुक्तीचे आग्रही प्रतिपादन आपल्या वैचारिक लेखनाद्वारे केले आहे."[१] अर्थातच उपेक्षितांचे संघर्षमय जगणे हा 'फकिरा'चा विषय आहे. शिगाव आणि वाटेगावमध्ये जोगणीवरून संघर्ष निर्माण होतो. शिगावचा आजोबा खोत काळगावच्या जत्रेतून जोगणी जीवाची बाजी लावून पळवून आणतो. ज्या गावात जोगणी त्या गावात जत्रा असा नियम असतो. जत्रा भरल्यामुळे गावची भरभराट होते. असा लोकांचा समज असतो. त्यामुळे वाटेगावचा राणोजी मांग शिगावमधील जत्रेत घुसून मोठ्या धाडसाने जोगणी मिळवतो. राणोजी जोगणी घेऊन वाटेगावच्या शिवमध्ये आलेला असतानाही बापू खोत राणोजीचे शीर धडापासून वेगळे करतो. राणोजी शिगावसाठी शहीद होतो. अशा लढाऊ, शूर आणि त्यागी राणोजी मांगाचा मुलगा म्हणजे फकिरा. हा फकिरा राणोजी सारखाच शूर, पराक्रमी



२१४

आणि बंडखोर आहे. त्याला अन्यायाची, अत्याचाराची प्रचंड चीड आहे. अर्थातच तो एक उपेक्षित बंडखोर, विद्रोही नायक आहे.

फकिरा विद्रोहाने पेटलेला, न्यायासाठी प्राण देण्यास सदैव तयार असणारा नायक आहे. माणुसकी हे त्याच्या जगण्याचे सूत्र आहे. शोषित, उपेक्षित माणसावर होणारा अन्याय, अत्याचार त्याला सहन होत नाही. त्यामुळेच तो इंग्रजांच्या विरोधात बंड पुकारतो. भुकेने व्याकूळ होऊन मरणारी माणसं पाहून फकिराचे मस्तक विद्रोहाने पेटून उठते. अन्न-अन्न करून मरणाऱ्या माणसांना वाचविण्यासाठी फकिरा भेडसगावातल्या खजिन्यावर स्वारी करतो. त्या तिजोरीतील सर्व वस्तूंची, संपत्तीची तो समप्रमाणात वाटणी करतो. यामुळेच हा फकिरा हा समतावादी आणि स्वातंत्र्यप्रिय नायक वाटतो. फकिराचा हा गुण टिपताना मच्छिंद्र सकटे लिहितात, "भेडसगावातला खजिना ज्या तिजोरीत होता ती तिजोरी फुटेना म्हणून गावातल्या वडराला बोलवून फकिरा त्याच्याकडून तिजोरी फोडून घेतो; पण त्या वडराची मजुरी द्यायला विसरत नाही. तसेच, खजिन्याची वाटणी करताना गावच्या गरिबांना मदत म्हणून आधी दोन समान भाग बाजूला काढतो नि उरलेल्या रकमेची सारखी वाटणी करून सर्व साथीदारांना देतो. आधी बाजूला काढलेले दोन भाग एक मांगवाड्यात, तर दुसरा महारवाड्यातील आपल्या गरीब बांधवांसाठी देतो. इथे फकिरा 'साम्यवादी' नसतो, तर 'समता'वादीच दिसतो. गरिबांवर प्रेम करणारा फकिरा 'दलित' असूनही श्रेष्ठ ठरतो."[२] फकिराचे हे वर्तन समता, न्याय, बंधुभाव आणि स्वातंत्र्यावर आधारलेले आहे. प्रस्थापित व्यवस्थेला हादरे देत शोषितांच्या न्याय हक्कासाठी तो लढा उभारतो. फकिराच्या या बंडखोर वृत्तीचे वर्णन मच्छिंद्र सकटे यांनी फार मार्मिक शब्दात केले आहे. ते लिहितात, "फकिरा स्वाभिमानी आहे, निर्भय आहे, प्रेमळ आहे, धाडसी आहे. 'हातात तलवार घेऊन भीक मागणे त्याला पसंत नाही', 'वैऱ्या हाती मान देण्यापेक्षा मरणालाच जीव देणं' त्याला अधिक पसंत आहे. म्हणूनच तो आपल्या समाजबांधवांचा 'दारकोंड' करणाऱ्या ब्रिटिशांच्या विरोधात बंड करण्याचे ठरवितो. आपल्या माणसांना ब्रिटिशांनी छावणीत डांबले, सहकारी बळी मांगाला ताब्यात घेतले म्हणून फकिरा बापू खोताला आणि रावसाहेब पाटलालाच कैद करतो. इथे फकिरा 'पाटलांच्या' विरोधात दिसत नाही, तो 'पाटीलकी'च्या विरोधात आहे."[३] कोणतेही बंड अन्यायी प्रवृत्तीच्या विरोधातच असते, याचे पक्के आणि सच्चे भान फकिराला आहे.

आपल्या समाजबांधवांनाब्रिटीशांकडून छळले जात असल्यामुळे शेवटी फकिरा पंतांच्या सल्ल्यानुसार छावणीत हजर होतो. फकिराबरोबरच सावळा, भिवा, मुरा, पिरा, खंडू, तायनू महार, हरी, बळी हे सर्व आत्मसमर्पण करतात. ब्रिटीशांच्या जुलमातून आपल्या समाजबांधवाना सोडविण्यासाठी फकिरा स्वतःहून जॉन साहेबांसमोर हजर होतो. आत्मसमर्पण केल्यानंतरही फकिरामधील स्वाभिमान जिवंत असतो त्यामुळेच तो जॉन साहेबाला आव्हानात्मक बोलतो. त्याच्या या संवादातून तो अन्यायाच्या विरुद्ध कसा पेटलेला आहे हे लक्षात येते. तो जॉन साहेबाला म्हणतो "आमी अशी तुमची पोरंबाळं दावनीला लावली नसती, तर तुमचा तानपट्टा काढून तुमास्नी घोड्याच्या टापांखाली तुडवून मारलं असतं"[४] हे ऐकून जॉन साहेब गंभीर होतो. फकिराने टेबलावर ठेवलेली तलवार उचलून तिची धार पाहात ही तलवार कुठं मिळाली? असा प्रश्न तो फकिराला विचारतो. त्यावर फकिरा म्हणतो, "ही तलवार माझ्या पूर्वजाला शिवाजीराजानं दिली."[५] यावरून फकिराच्या



215

संघर्षाची परंपराही लक्षात येते आपल्या माणसांचा जीव वाचावा म्हणून ही संघर्षाचं प्रतीक असलेली तलवार फकिरा खाली ठेवतो. ज्या घोड्याच्या आणि तलवारीच्या जोरावर फकिराने बंड पुकारले होते तो घोडा आणि तलवार आपल्या आजोबाला परत करावी असे तो जॉन साहेबाला सांगतो. फकिरा आणि त्याचे साथीदार आत्मसमर्पण केल्यानंतर दारकोंड केलेल्या लोकांना ब्रिटीशांकडून मुक्त केले जाते फकिराच्या या आत्मसमर्पणामागे त्यागाची, स्वातंत्र्याची प्रेरणा दडलेली आहे. अर्थातच फकिराचा जीवनसंघर्ष विद्रोहात्मक सामाजिक न्यायाची, स्वातंत्र्याची प्रेरणा घेऊन येणारा आहे. फकिराचे आत्मसमर्पण एका धगधगत्या बंडाचा, विद्रोहाचा शेवट असला तरी तो अनेकांच्या मुक्तीचा, स्वातंत्र्याचा श्वासही आहे. कादंबरीच्या शेवटी फकिराने दिलेली तलवार मिठीत घेऊन रडणारी राधा फकिराच्या नावाने हंबरडा फोडते. डोळ्यात फकिराच्या बलिदानाचे अश्रू असले तरी हातात मात्र फकिराने दिलेली तलवार आहे. यावरून कादंबरीचा शेवट किती सूचक आणि अन्वर्थक आहे याची जाणीव होते.

थोडक्यात, 'फकिरा' ही कादंबरी विद्रोही जीवनजाणिवा घेऊन येणारी आहे. म्हणून डॉ. वैशाली भालसिंग लिहितात, '' 'फकिरा' ही एका उमद्या माणसाची झुंजार जीवनगाथा आहे. त्याच वेळी ती मांगांच्या व्यथा-वेदनांचे जिवंत चित्र आपल्यासमोर उभे करते एका जमातीचे सलग दर्शन तोपर्यंतच्या मराठी साहित्यात क्वचितच आले असेल. जुन्या गावगाड्यातील धर्मजीवन, जत्रा.खेत्रा, सण.समजुती, ग्रामव्यवस्था, सवर्ण आणि दलित यांचे परस्परसंबंध त्यातील क्रौर्य आणि माणुसकी या सगळ्यांचे दर्शन या कादंबरीतून घडते. 'फकिरा'चा संबंध त्याच्या कुटुंबाशी आणि गावाशी आहे. तसाच तो त्याच्या जातीशी आणि वर्गाशी आहे. त्यातून निर्माण होणाऱ्या विविध समस्यांची गुंतागुंत अण्णा भाऊंनी सहृदयतेने रेखाटली आहे कादंबरीतील जीवनदर्शनाला अधिक व्यापक रूप येते ते परकीय सत्तेशी फकिराच्या झडणाऱ्या संघर्षाने. हे सगळे धागे अण्णा भाऊंनी मोठ्या चातुर्याने एकत्र गुंफलेले आहेत. वेदनेकडून विद्रोहाकडे जाणारा फकिरा आपल्या काळजात घर करून राहतो.''[६]
'फकिरा' ही कादंबरी अनेक दृष्टींनी महत्त्वाची आहे. ग्रामीण, प्रादेशिक, दलित, ऐतिहासिक कादंबरी म्हणून ती जशी महत्त्वाची आहे तशी ती एक उपेक्षित नायकाचे विद्रोही जीवन समाजासमोर आणणारी कादंबरी म्हणूनही महत्त्वाची आहे. फकिराचे बंड सामाजिक न्यायाची आणि स्वातंत्र्याची प्रेरणा घेऊन येत असल्यामुळे त्याचे जगणे त्याचा हा संघर्ष एका व्यवस्था परिवर्तनाचा इतिहास ठरतो.फकिरा या व्यवस्था परिवर्तनाच्या लढ्यातील महत्त्वाचा नायक आहे.

**संदर्भ सूची :**


| | | |
|---|---|---|
| १. गुरव बाबुराव | : | अण्णा भाऊ साठे - समाजविचार आणि साहित्यविवेचन, . लोकवाङ्मयगृह मुंबई दु. आ. १९९९,पृ. २७. |
| २. सकटे मच्छिंद्र | : | अण्णा भाऊ साठे - एक सत्यशोधक, प्रज्ञा प्रकाशन कोल्हापूर, प. आ. २००५, पृ. ११४. |
| ३. तत्रैव पृ. ११४. | | |
| ४. साठे अण्णा भाऊ | : | फकिरा, सुरेश एजन्सी पुणे, अठ्ठाविसावी आ. २०१०, पृ. १४२. |
| ५. तत्रैव, पृ.१४२. | | |
| ६. भालसिंग वैशाली | : | फकिरा एक आकलन, लोकवाङ्मयगृह मुंबई, प्रथम आवृत्ती २००४, पृ. ११. |


■■■



**Principal**
A.V.Education Society
Degloor College Degloor

216